# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १३७ वा गुरूवार दि.१९ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## १६ न्यायाधीशांच्या बदल्यांना राष्ट्रपतींची मंजुरी

नवी दिल्ली : मणिपूर उच्च न्यायालयाच्या कार्यवाहक मुख्य न्यायाधीशांसह अन्य उच्च न्यायालयातील १६ न्यायाधीशांच्या बदल्यांना राष्ट्रपतींनी मंजूर दिली आहे. अनेक न्यायाधीशांच्या बदलीसाठी राष्ट्रपतींकडे शिफारस करण्यात आली होती. त्यापैकी १६ न्यायाधीशांच्या बदलीला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली आहे. या १६ न्यायाधीशांपैकी न्यायमूर्ती एसपी केसरवानी यांची अलाहाबाद उच्च न्यायालयातून कोलकाता उच्च न्यायालयात तर न्यायमूर्ती राजेंद्र कुमार (चतुर्थ) यांची मध्य प्रदेश उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आहे. न्यायमूर्ती नरेंद्र जी यांची कर्नाटक उच्च न्यायालयातून आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आहे.



पाटणा उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती सुधीर सिंग यांची पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात तर न्यायमूर्ती मधुरेश प्रसाद यांची कोलकाता उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आहे. मणिपूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एमव्ही मुरलीधरन यांना कोलकाता उच्च न्यायालयात, गुवाहाटी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तागिया यांची पाटणा उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आहे.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती सी मानवेंद्र नाथ रॉय यांना गुजरात उच्च न्यायालयात पाठवण्यात आले असून अतिरिक्त न्यायाधीश दुप्पल व्यंकट रमन यांना मध्य प्रदेश उच्च न्यायालयात पाठवण्यात आले आहे. तसेच कोलकाता उच्च न्यायालयातील अतिरिक्त न्यायाधीश लुपिता बॅनर्जी यांची पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आहे. तेलंगणा उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती मुन्नूरी लक्ष्मण यांची राजस्थानला तर न्यायमूर्ती अनुपमा चक्रवर्ती यांची पाटणा उच्च न्यायालयात बदली करण्यात आली आहे.

## पीएमएलए तरतुदींचे पुनरावलोकन होणार; सर्वोच्च निर्णय

नवी दिल्ली : पीएमएलए अंतर्गत ईडीच्या अधिकारांविरोधातील याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालय आता पीएमएलए तरतुदींचे पुनरावलोकन करणार असून सर्वोच्च न्यायालयाने केंद्राची मागणी फेटाळून लावली आहे. सध्या सुनावणी घेऊ नये, अशी मागणी केंद्राने केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठाने राष्ट्रीय हितासाठी काही पीएमएलए तरतुदींचे पुनरावलोकन एका महिन्याने पुढे ढकलण्याची केंद्राची मागणी नाकारली. एसजी तुषार मेहता म्हणाले होते की, जोपर्यंत आंतरराष्ट्रीय वॉचडॉग एफएटीएफ मनी लॉंड्रिंग गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी भारताचे मूल्यांकन पूर्ण करत नाही तोपर्यंत किमान राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने एक महिना सुनावणी होऊ नये. ते असेही म्हणाले की, २०२२ चा निर्णय तीन न्यायमूर्तींचा होता ज्यावर पुनर्विलोकन याचिका प्रलंबित आहे, अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींचे हे खंडपीठ सुनावणी करू शकत नाही.



मात्र, न्यायमूर्ती संजय किशन कौल, न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी यांच्या खंडपीठाने केंद्राचा हा युक्तिवाद फेटाळून लावला. न्यायमूर्ती संजय किशन कौल म्हणाले की, आम्हाला सुनावणी घेण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. सुनावणी दरम्यान आम्ही निर्णय घेऊ की, आम्ही या प्रकरणाची सुनावणी करू शकतो की नाही.जुलै २०२२ मध्ये एका याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने मनी लॉंडरिंग कायदा कायम ठेवला होता. याचिकाकर्त्यांनी पुनर्विचार याचिका दाखल करून या प्रकरणाचा फेरविचार करण्याची विनंती न्यायालयाला केली होती. यापूर्वी २५ ऑगस्ट २०२२ रोजी सुप्रीम कोर्टाने पुनर्विचार याचिकेवर सुनावणी केली होती. तसेच न्यायालयाने यापूर्वी म्हटले होते की, आम्ही काळा पैसा आणि मनी लॉंड्रिंग थांबवण्याच्या समर्थनात आहोत, परंतु आम्हाला वाटते की काही मुद्द्यांवर पुनर्विचार करणे आवश्यक आहे. या कायद्यातील दोन नियमांबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला नोटीस पाठवली होती.खंडपीठ स्थापन या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आले असून न्यायमूर्ती संजय किशन कौल, न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती बेला एम त्रिवेदी यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे.तपास राष्ट्रीय हिताचा असू शकतो सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, पीएमएलएच्या तरतुदींचा तपास राष्ट्रीय हिताचा असू शकतो. आता या प्रकरणाची सुनावणी २२ नोव्हेंबरला होणार आहे.

## हुसेन पठाण यांच्या कामगिरीमुळे वाचले हरीणाचे प्राण

लातूर / प्रतिनिधी :- बाभळगाव लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील सारोळा बाभळगाव रोडवरील शेतकरी इनुसपाशा शेख यांच्या शेतात गट नं ३८ मध्ये सकाळी अंदाजे ८ वाजेच्या सुमारास श्री हुसेन पठाण यांना काही हरणांचा कळप गटाने एका झाडाखाली बसलेला दिसला. शेतात नेहमीच हरणे येत जात असतात म्हणुन पठाण यांनी दुर्लक्ष केले मात्र माणसाची चाहुल लागलेली पाहताच हरणे पळून गेली. तेव्हा पठाण यांना हरणाचे नवजात अर्भक त्याच ठिकाणी बसलेले दिसुन आले. पठाण यांना हे हरीणाचे पिल्लू भुकेले आढळुन आले .तसेच पिल्याच्या मागावर चार पाच कुत्रीही असलेली दिसुन आली. पठाण यांनी या पिल्लाचे भुक व कुत्र्यापासून संरक्षण करत पोलिस स्टेशन व वनविभागाला संपर्क केला. मात्र सकाळपासून संपर्क केल्यानंतर सायंकाळी ५ च्या सुमारास पोलिस व वनविभागा चे आधिकारी घटना स्थळी पोचले व त्या हरीणाच्या पिल्लाला जीवदान मिळाले. हे काम करून हुसेन पठाण यांनी आपल्यातली माणूसकी पुन्हा एकदा सिद्ध केली. यावेळी लातूर ग्रामीणचे पोलिस निरीक्षक वाघमारे, वन परीक्षेत्र आधिकारी रामपुरे, राउंड ऑफिसर बिराजदार आदी उपस्थित होते.



## मोदीजींच्या नेतृत्वात महाविजय २०२४ साठी भाजपा कार्यकर्त्यांनी जिद्दीने कामाला लागावे भाजपाचे प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांचे आवाहन

लातूर दि.१८ - भारतीय जनता पार्टीने बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख याबरोबरच सुपर वॉरियर्स ही संघटनात्मक कामासाठी रचना केली असून येत्या काळात देशासाठी यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात महाविजय २०२४ करीता भाजपा लढत असून भाजपाच्या कार्यकर्त्यांनी विजयी भूमिकेतून जिद्दीने कामाला लागावे असे आवाहन प्रदेश भाजपाचे सरचिटणीस संजय केनेकर यांनी केले आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ चंद्रशेखरजी बावनकुळे हे येत्या २८ ऑक्टोबर रोजी भाजपाच्या संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने लातूर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सुपर वॉरियर्स म्हणून जबाबदारी दिलेल्या प्रमुखांची बैठक आ. रमेशआप्पा कराड यांच्या संवाद भाजपा कार्यालयात बुधवारी सकाळी झाली. या बैठकीत संजय केनेकर बोलत होते याप्रसंगी भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा प्रभारी प्रा. किरण पाटील, जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. भारतीय जनता पार्टीने पक्षाच्या कार्यकर्त्यांसह प्रमुखांना बूथची जबाबदारी दिली आहे. त्यामुळे प्रत्येकानी शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, गरजूंना लाभ मिळवून द्यावा, पक्षाचे विविध कार्यक्रम प्रभावीपणे राबवून आपण कुठेही कमी पडणार नाहीत याची दक्षता घ्यावी. बुथवर केलेल्या सर्व कामाची दखल प्रदेश भाजपा घेत असल्याची माहिती संजय केरेकर यांनी यावेळी दिली. अठरा पगड जातीतील बारा बलुतेदारातील उपेक्षितांना न्याय मिळावा, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, स्वाभिमानाने जगता यावे यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी विविध आठरा व्यावसायिकाकरिता आणि देशाची संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी विश्वकर्मा योजना सुरू केली असल्याची माहिती देऊन संजय केनेकर म्हणाले की, या योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाणार असून व्यवसायासाठी लागणाऱ्या उपकरणाकरिता १५ हजार देण्यात येणार असून व्यवसायासाठी एक लाखाचे कर्ज मिळणार आहे. तेव्हा भाजपा कार्यकर्त्यांनी गरजूंना विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून मदत मिळवून द्यावी असे आवाहन केले. प्रारंभी मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक लक्षात घेऊन भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाचे काम प्रभावीपणे करावे असे आवाहन केले जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले.






## अर्धपोटी रहा पण मुलांना शिकवा - सरसेनानी आनंदराज आंबेडकर

मुंबई / प्रतिनिधी :- शाळा, कारखाने, सरकारी क्षेत्रात खाजगीकरण करण्याचा घाट सरकारने चालवला असल्याने आरक्षणाची गळचेपी होत आहे त्यामुळे भविष्यात तळागाळातील गोरगरीब विद्यार्थी, तरुणांना शिक्षण व रोजगार मिळण्याची वानवा निर्माण होणार आहे याचे भान ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून शैक्षणिक, रोजगार क्षेत्रात दिलेल्या सुविधांचा फायदा घेत आपल्या पाल्यास उच्चशिक्षित करा वेळप्रसंगी आयडीला पीळ मारून, अर्धपोटी राहून मुलांचं शिक्षण पूर्ण करा कारण शिक्षण हेच तुमच्या उज्वल भविष्याची पुंजी बनून तुम्हाला कामी येणार आहे, खाजगीकरणाच्या नावावर सरकारने जरी पंख छाटण्याचे काम केले तरी शिक्षण त्या पंखाना पुन्हा बळ देऊन यशाच्या आसमंतात उंच भरारी घेण्यास मदत करेल, वडील झाडूखात्यात असतील तर त्यानी आपल्या मुलाला क्लास वन ऑफिसर, उच्चअधिकारी बनवण्याचे स्वप्न बाळगलं पाहिजे, मुलांना चांगले शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे केले पाहिजे व मुलांनीही उच्चशिक्षित होऊन समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे प्रतिपादन आदरणीय आनंदराज आंबेडकर यांनी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाच्या वेळी प्रमुख वक्ते या नात्याने बोलताना केले. बौध्दजन पंचायत समिती संलग्न शिक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पदवीधर, पदविकाधर, दहावी, बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचा कार्यक्रम मा. सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.




सदर प्रसंगी प्रमुख अतिथी मा. नरेंद्र कवडे (भा.प्र.से., सेवानिवृत्त ख-ड अधिकारी), शिक्षण विषयावर झह.ऊ करणारे गोरेगावचे सुपुत्र डॉ. दिलीप रामचंद्र साळवी, गुहागर तालुक्यातील सुकन्या चझडउ परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थीनी मधुरीमा अनंत जाधव यांचा विशेष सन्मान मा. आनंदराज आंबेडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस राजेश घाडगे यांनी केले तर पाहुण्यांचे स्वागत मा. अध्यक्ष यांनी केले तर शिक्षण समिती अध्यक्ष राजेश पवार यांनी प्रास्ताविक सादर केले त्यात त्यांनी बौध्दजन पंचायत समितीचा उद्देश व शैक्षणिक क्षेत्रात असलेले मोलाचे कार्य व पुढील काळात राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात शिक्षण समिती चिटणीस विश्वास मोहिते यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली, सदर प्रसंगी बौध्दजन पंचायत समितीचे उपसभापती विनोदजी मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, माजी कार्याध्यक्ष किशोरजी मोरे, सरचिटणीस राजेश घाडगे, उपकार्याध्यक्ष अशोक कांबळे, एच.आर.पवार, मनोहर मोरे, चंद्रमनी तांबे, निवड समितीचे माजी अध्यक्ष सेशन जाधव, खजिनदार नागसेन गमरे, कार्यकर्ते, व्यवस्थापक मंडळाचे चिटणीस रवींद्र पवार, विठ्ठल जाधव, संदेश खैरे, तुळशीराम शिर्के, राजाभाऊ तथा रामदास गमरे, अशोक कदम महिला मंडळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, माजी कार्याध्यक्ष किशोरजी मोरे, सरचिटणीस राजेश घाडगे यांनी ही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले, त्याचबरोबर लक्ष्मणजी भगत यांनी सभागृहात उपस्थितांना संबोधित करताना संविधान धोक्यात असल्याने माननीय आनंदराज आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात संविधान सन्मान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे, तरी जिथे जिथे रॅली पोहोचेल त्या त्याठिकाणी आपण सहभागी होऊन रॅलीस सहकार्य करावे असे आव्हान केले, तसेच उपसभापती विनोदजी मोरे यांनी विद्यार्थ्यांच भवितव्य या विषयावर तीन सूत्रात विद्यार्थ्यांना प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी जवळपास दोनशे विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले, तसेच सहा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देऊन गौरविण्यात आले. सरतेशेवटी विश्वास मोहिते यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## संपादकीय....

# असेही नाही अन् तसेही नाही!

विवाह हा मूलभूत अधिकार नाही. समलिंगींना लग्न करायचे असेल तर ती त्यांची वैयक्तिक बाब आहे. परंतु त्या विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यासाठी कायदा करणे सरकारचे काम आहे. न्यायालयाने विशेष विवाह कायद्यात हस्तक्षेप केला तर आपण स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीत जाऊ. समलैंगिकता शहरी, उच्चभ्रू वर्गापर्यंतच मर्यादित नाही. विवाहसंस्थेला कायम स्थिर असणारी, बदलता न येणारी व्यवस्था ठरवणे चुकीचे होईल. जोडीदार निवडण्याचा अधिकार हा राज्यघटनेच्या कलम २१ अन्वये जीवन व स्वातंत्र्याच्या अधिकारांतर्गत येतो. भिन्नलिंगी दाम्पत्यच चांगले आई-वडील होऊ शकतात, असे मानणे समलिंगी जोडप्याबाबत भेदभाव करण्यासारखे होईल. समलिंगी व्यक्तीसोबत भेदभाव होऊ नये हे समानतेच्या तत्त्वात अपेक्षित आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.थोडक्यात काय असेही नाही अन् तसेही नाही! समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यास सुप्रीम कोर्टाने मंगळवारी स्पष्टपणे नकार दिला. समलिंगी व्यक्तींना आपला जोडीदार निवडण्याचा व त्यांच्यासोबत राहण्याचा अधिकार आहे पण त्यांच्या संबंधांना कायदेशीर मान्यता देण्याचे आदेश सरकारला दिले जाऊ शकत नाहीत. कायदा बनवण्याचे काम संसदेचे असून तो कायदा लागू करण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले. या समलिंगी जोडप्यांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार देता येऊ शकत नाही असेही पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने सांगितले. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. संजय किशन कौल, न्या. एस. रवींद्र भट, न्या. हिमा कोहली आणि न्या. पी. एस. नरसिम्हा यांच्या खंडपीठाने समलिंगी विवाहाच्या मान्यतेच्या मागणीवर मंगळवारी निकाल दिला. समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यास नकार देतानाच समलिंगी साथीदारांच्या अधिकारांसाठी समिती नेमता येईल, त्यानुसार निर्णय घेता येईल. परंतु विवाहाला मान्यता देणे आमच्या अधिकार कक्षेत नाही किंवा सरकारला आम्ही तसा आदेश देऊ शकत नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

बहुमताने हा निकाल देण्यात आला आहे. खंडपीठाने ३ विरुद्ध २ मतांनी समलिंगी विवाहांना मान्यतेची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. भारतात समलिंगी संबंधाला मान्यता असली तरी समलिंगी विवाहाला मान्यता नाही. काही देशांत समलिंगी विवाह वैध मानले जातात. जगातील सुमारे ३४ देशांमध्ये समलिंगी विवाहाला मान्यता आहे. त्यात अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, कॅनडा, ब्राझील, चिली, क्युबा, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, द. आफ्रिका, स्पेन, स्वीडन, स्वित्झर्लंड, नेदरलँड, न्यूझिलंड, तैवान, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, उरुग्वे यासारख्या देशांचा समावेश आहे. जगातील २३ देशांमध्ये समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. ऑस्ट्रेलिया, आयर्लंड आणि स्वित्झर्लंडने देशव्यापी मतदानानंतरच कायद्याद्वारे समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता दिली. द. आफ्रिका आणि तैवान या दोन देशांनी समलिंगी विवाहाला कायदेशीर ठरवून न्यायालयाने आदेश जारी केल्यानंतर समलिंगी विवाहाला मान्यता देण-ारा कायदा केला.जगात असेही काही देश आहेत जिथे समलिंगी विवाह केल्यास कायद्यानुसार शिक्षेची तरतूद आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान, संयुक्त अरब अमिराती, कतार आणि मॉरिटोनिया या पाच देशांत समलिंगी विवाह केल्यास फाशीची शिक्षा दिली जाते. समलिंगी विवाहा संदर्भातील गत काही महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या याचिकांवर तो अमान्य असल्याचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या तांत्रिक मर्यादा स्पष्ट करण्यास प्राधान्य दिले आहे. 'सर्वोच्च न्यायालय कायदा बनवू शकत नाही, केवळ कायद्याची व्याख्या करू शकते' असे सांगून 'कायदे संसदेत बनतात' हे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाला पूर्णत: समलिंगींचे म्हणणे डावलायचे आहे असे नाही आणि न्यायालय संसदेप्रमाणे कायदेमंडळाची भूमिकाही घेऊ शकत नाही. न्यायालयाने 'ही समस्या केवळ शहरी किंवा केवळ या काळातील आहे, असे नाही. विवाह ही काही स्थायी (स्थिर) संस्था आहे असेही नाही आणि नाही असेही नाही' असेही म्हटले. परिवार, भावना, नाती आदी गोष्टींचे महत्त्व लक्षात घेता न्यायालयाने समलिंगी जोडप्यांना मूल दत्तक घेण्याचा अधिकृत अधिकार दिला आहे.या निर्णयानुसार कुठल्याही सामाजिक क्षेत्रात किंवा ठिकाणी त्यांच्यावर कुणीही अन्याय किंवा भेदभाव करू शकत नाही. तसेच समलिंगी एकत्र असतील तर पोलिसही त्यांना घरी जाण्यासाठी बळजबरी करू शकत नाहीत. पूर्वी भारतात 'समलैंगिकता' हा गुन्हा होता, मात्र २०१८ पासून तो गुन्हा राहिलेला नाही. त्यामुळे समलैंगिकांनी एकत्र येण्यास सध्यातरी कुठलीही बंदी नाही, मात्र त्यांना विवाहाची अधिकृत अनुमती द्यायची झाली तर त्या अनुषंगाने अन्य अनेक कायद्यांमध्ये तसेच अन्य अनेक क्षेत्रातील गोष्टीत बदल करावा लागेल आणि ही सारी प्रक्रिया जटील अन् गुंतागुंतीची होईल. 'स्पेशल मॅरेज अॅक्ट' नुसार विवाह अधिकृत करण्यात यावा अशी याचिकाकर्त्यांची मागणी होती. सरन्यायाधीश चंद्रचूड आणि न्या. कौल यांनी समलिंगी विवाहाचा व्यापक अंगाने विचार करत अनुमती दर्शवली मात्र इतर तीन न्यायाधीशांनी या विरोधात मत नोंदवले. समलिंगी विवाह हा मूलभूत अधिकार नाही यावर मात्र पाचही न्यायाधीशांचे एकमत झाले. भारतात विवाह हा एक संस्कार आहे. भारतीय कुटुंब पद्धतीनुसार एक जैविक पुरुष आणि एक जैविक स्त्री यांच्यापासून जन्मलेल्या मुलांमुळे कुटुंब बनते. त्यामुळे समलिंगी विवाह हा मूलभूत अधिकारात येत नाही.विरुद्ध लिंगी ट्रान्सजेंडर जोडप्यांना लग्नाचा कायदेशीर अधिकार आहे असे खंडपीठाने म्हटले आहे. एखाद्या व्यक्तीचे लिंग म्हणजेच त्याची लैंगिकता नाही. त्यामुळे ट्रान्सजेंडर जोडपे विरुद्ध लिंगी नातेसंबंधात असू शकतात. त्यामुळे ट्रान्सवूमन आणि ट्रान्समॅन यांच्यात लग्न होऊ शकते. समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता दिलेली नाही मात्र समलिंगी जोडपे म्हणून एकत्र राहण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

# मोबाईल : वरदान की श्राप

हल्ली रस्त्यावरून प्रवास करताना एक बाब सातत्याने खटकते ती म्हणजे गाडी चालवताना नाहक मोबाईलचा होत असलेला वापर. आपण पाहतो छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत अनेकजण सर्रासपणे संदेश वाचत गाडी चालवणे, कॉल उचलून बोलत गाडी चालवणे, थोड्या थोड्या वेळाने उगीच मोबाईल काढून पाहणे हे नेहमीचे झाले आहे. सरकारकडून ठिकठिकाणी रस्त्यावर सुरक्षिततेबाबत पाट्या लावलेल्या असतात परंतु याकडे दुर्लक्ष करून अनेकजण गैरजबाबदारीने वाहन चालवताना दिसतात.सध्याच्या परिस्थितीत अपघातांत होत असलेली प्रचंड वाढ यात मोबाईल हे सुद्धा मुख्य कारण असणे नाकारता येत नाही. मी एके ठिकाणी पाहिलेला किरकोळ अपघात ज्यात कानाला मोबाईल लावून आणि तिरकी मान करून फोनवर बोलत मोटारसायकल चालवणारा तरुण छोट्या रस्त्यावरून मुख्य रस्त्यावर येत असताना अचानक समोरून आलेले वाहन पाहून मोटारसायकल नियंत्रित न झाल्याने वळण्याऐवजी सरळ समोर जाऊन मोठ्या नाल्यात मोटारसायकलसहित पडला. बरं एवढ्यावर तो थांबला असता तर ठीक परंतु त्यानंतर सुद्धा मोटारसायकल तशीच सोडून तो उठला आणि कपडे झटकत परत फोनवर बोलत उभा राहिला. सुदैवाने जास्त दुखापत झाली नव्हती परंतु विचार करण्यास भाग पाडणारे ते एकंदरीत दृश्य होते.

जीवन हे अनमोल आहे मग त्याचे महत्त्व आपणाला कळत नाहीये का असा प्रश्न काही दृश्ये पाहताना पडतो. किती महत्त्वाचा कॉल अथवा मेसेज असला तरी तो जिवापेक्षा जास्त किमती आहे का? जर एखाद्या व्यक्तीचा आलेला फोन आपण टाळला आणि कुठेतरी सुरक्षित ठिकाणी थांबून मग त्याच्याशी बोललो तर जो पाच-दहा मिनिटे उशीर झालेला असेल. त्यात खूप मोठे नुकसान होते असे नाही. एव्हाना जास्त तर येणारे कॉल्स हे किरकोळ गोष्टीसाठी असतात. तरुण मुलांच्या बाबतीत तर केवळ मित्रांच्या व्हॉट्सअॅप आणि फेसबुक पोस्ट वाचण्यासाठी गाडी चालवत वेळ देत असतात. जिवाची पर्वा न करता असले कृत्य नेमके कशासाठी करतो हा विचार करायला हवा. मोबाईल हा आजच्या आधुनिक युगासाठी खूप महत्त्वाचा दुवा बनला आहे.जसे त्याचे फायदे तसेच त्यामुळे नुकसानही होते.

मोबाईलमुळे जीवन जगणे जरी सोपे झाले असले तरी फायद्यापेक्षा जास्त त्याचे नुकसान पाहायला मिळते. नवनवीन अपडेट्स असलेले मोबाईल घेऊन तासन्तास त्यावर वेळ घालवणारे अनेकजण पाहायला मिळतात. मोबाईलचा सदुपयोग म्हणजे त्याद्वारे जीवनात सहजता यावी आणि अत्यंत तातडीच्या वेळी मोबाईलमुळे मदत घेता यावी परंतु असे घडताना दिसत नाही. ऑनलाईन गेम आणि सोशल अॅपवरून मैत्री होते आणि त्या फसव्या मैत्रीतून पुढे निराशा वाढून जीवन संपवलेले काही उदाहरणे आहेत तर मोबाईलचा गैरवापर करून फसवणूक झाल्याची पण बरीचशी उदाहरणे आपण पाहिलेली किंवा ऐकलेली असतील. इमेल आणि मेसेज बॉक्समध्ये आलेल्या अनेक प्रकारच्या वेबलिंक्सवर क्लिक करताच त्याद्वारे मोबाईल हॅक केला जातो आणि मग आपल्या नकळत आपल्या बँक खात्यामधून पैसे जातात आणि आपली फसवणूक होते. आपल्या दैनंदिन जीवनात



सकाळच्या चहापासून तर रात्री झोपण्यापूर्वीपर्यंत प्रत्येक गोष्टीचे अपडेट्स शेअर करण्याची काही जणांना सवय असते आणि हे शेअर करताना आपण हे विसरून जातो की याचा गैरवापर करून जाळ्यात अडकवणारे अनेक हॅकर्स किंवा गुन्हेगार अशा पोस्टची वाट पाहून असतात. आपल्याला आलेला संदेश, व्हीडीओ, कुणाचे वक्तव्य, एखाद्या घटनेचा वृत्तांत हे सर्व आपल्या ठिकाणी एकवेळ पडताळून मगच पुढे पाठवण्याची सवय लागली तर समाजात निर्माण होणारी तेढ कमी करणे सहज शक्य होईल. कोणतेही अॅप इंस्टॉल करताना फोन गॅलरी, कॉल लॉग, मीडिया कंटेंट, मेसेज बॉक्स, कॅमेरा या सर्वांचा अॅक्सेस घेण्यासाठी अलाऊ आणि डेनाई असे ऑप्शन्स विचारले जातात आणि आपण स्वत: आपल्या संपूर्ण फोनचा अॅक्सेस त्या अॅपला देऊन टाकतो.आपण कधी विचार केला का आपण जे काही गूगलवर शोधत असतो त्या वस्तूंच्या बाबतीत फोनवर जाहिरात, कॉल्स आणि मेसेज येत राहतात. आपण दिलेल्या अॅक्सेसमुळे गुन्हेगार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत सोशल साईट अथवा अॅपमधील फोटोवरचे चेहरे वापरून अश्लील फोटो आणि व्हीडीओज बनवले जातात व ते व्हायरल करण्याची धमकी देऊन खंडणीची मागणी केली जाते. सिम कार्ड ब्लॉक झाले, वीज बिल बाकी आहे, एटीएम ब्लॉक झाले आहे, बँक खाते बंद झाले आहे, कुरिअर आले आहे अशी अनेक कारणे देऊन ओटीपी मागितला जातो आणि अनेकजण सहजरीत्या सर्व विचारलेली माहिती देऊन मोकळे होतात आणि जेव्हा खात्यातून पैसे वजा होतात तेव्हा पश्चाताप करत बसतात.

महिलांनी प्रामुख्याने सोशल साईट वापरताना काळजी घ्यावी. अनोळखी व्यक्ती किंवा समूह यांच्याकडून आलेली फ्रेंड रिक्वेस्ट टाळावी किंवा त्या व्यक्ती अथवा समूहाची योग्य शहानिशा करून मगच स्वीकारावी म्हणजे नंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा अगोदर काळजी घेतलेली बरी. एकंदरीत फसवणुकीचे अनेक प्रकार घडत असताना आरोग्यासाठी सुद्धा मोबाईल हानिकारक ठरत आहे. मोबाईलचा अतिवापर केल्याने लहान मुलांमध्ये नजरदोष आणि मेंदुविकार असले आजार होताना पहावयास मिळतात. महिलावर्ग कामात अडथळा करू नये म्हणून लहान मुलांना मोबाईलवर व्हीडीओ लावून देतात आणि तासन्तास काम करत राहतात. अभ्यासाच्या नावाखाली मोबाईल घेऊन त्यावर नको ते पाहताना पण अनेक पालकांनी मुलांना पकडले असेल. पालकांनी मुलांना मोबाईल दिल्यानंतर दुर्लक्ष करण्याऐवजी तिसरा डोळा कायम राखून ठेवला तरच काही प्रमाणात गैरवापर होण्यापासून थांबवता येईल. मोबाईलवर पीडीएफ स्वरूपात पुस्तके उपलब्ध असतात, अनेक प्रकारची महत्त्वाची माहिती गोळा करता येते,साहित्य वाचन करता येते, मुलांसाठी अनेक प्रकारचे कार्टून स्वरूपात छान छान गोष्टी, बोधकथा पण सहज उपलब्ध होतात आणि याद्वारे मुलांना योग्य संस्कार देण्याचे काम पण करता येते.

-पवन श्रीरंगसा कुसुंदल, नांदेड
मोबा. ९०७५५ ९५६९५

# परदेशातील शिक्षणाचे वास्तव

आपल्या देशात गेल्या काही वर्षांत परदेशात शिक्षण घेणा-यांचे आणि तेथे स्थायिक होण्यासाठी प्रयत्न करणा-यांचे प्रस्थ वाढत चालले आहे. केंद्र सरकारच्या मते, २०१६ ते २०२१ या काळात देशातून २६.४४ लाख भारतीय विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी गेले होते. भारतीय उद्योग आणि वाणिज्य मंडळ (असोचेम)च्या अंदाजानुसार २०२० मध्ये ४.५ लाख विद्यार्थी हे शिक्षणासाठी परदेशात गेले आणि त्यांनी सुमारे १३.५ अब्ज डॉलर खर्च केले. २०२२ मध्ये हा खर्च २४ अब्ज डॉलर म्हणजे सुमारे दोन लाख कोटी रुपये इतका होता. रेडिसियर स्ट्रॅटजी कन्सल्टन्सी नावाच्या सल्लागार संस्थेच्या म्हणण्यानुसार २०२४ पर्यंत हा खर्च ८० अब्ज डॉलर म्हणजे सात लाख कोटींपर्यंत पोचू शकतो. एका अंदाजानुसार, आगामी काळात २० लाख भारतीय विद्यार्थी परदेशात जातील.

केंद्रीय परराष्ट्र राज्य मंत्री व्ही. मुरलीधरन यांनी २५ मार्च २०२२ रोजी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, सध्याच्या काळात १३ लाख भारतीय विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत असून ही संख्या सातत्याने वाढत चालली आहे. सरकारच्या मते, २०२१ मध्ये ४.४४ लाख विद्यार्थी परदेशात गेले. तर अन्य एका सरकारी मतांनुसार, गेल्या वर्षी नोव्हेंबरपर्यंत परदेशात जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या ४५ टक्क्यांनी वाढून ती ६.४६ लाख झाली आहे. राज्यनिहाय आकडेवारी पाहिली तर २०२१ पर्यंत परदेशात जाणा-या विद्यार्थ्यांत पंजाब आणि आंध्र प्रदेशातील विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रत्येकी १२ टक्के होते; तर गुजरातचा यामधील वाटा ८ टक्के आहे. तरुणांची एकूण संख्या पाहिल्यास पंजाबमधील प्रति हजार मुलांमागे सात तरुण, आंध्र प्रदेशातील चार, गुजरातमधील किमान दोन तरुण दरवर्षी परदेशात जात आहेत. शिक्षणासाठी परदेशात जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढणे हा देश म्हणून चिंताजनक विषय आहे. यात सर्वाधिक चिंता म्हणजे देशातील तरुण कार्यशक्ती देशाबाहेर जात आहे. त्यामुळे कालांतराने देशात उद्योगासाठी मनुष्यबळाची कमतरता भासू शकते.

याशिवाय देशातील बहुमूल्य परकी चलन परदेशात जात आहे. एक काळ असा होता की परदेशात राहणा-या भारतीयांच्या माध्यमातून पंजाबच्या एका गावात मोठ्या प्रमाणात परकी धन यायचे. मात्र आता परदेशात शिक्षण घेण्याचा ट्रेंड वाढल्याने ही प्रक्रिया उलटी झाली आहे. अशावेळी २०२४ मध्ये परदेशात जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या २० लाख होणे आणि त्यांच्याकडून खर्च होणारी रक्कम ही ८० अब्ज डॉलरपर्यंत पोचणे ही स्थिती चिंताजनक राहू शकते. यातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, भारताबाहेर जाण्याचा ट्रेंड हा देशातील शिक्षण व्यवस्थेतील उणिवांमुळे होत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. देशात गेल्या दोन-तीन दशकांत शिक्षण क्षेत्रात प्रगती झाली आहे. उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची संख्या पाहिली तर १९९०-९१ मध्ये ४९.२ लाख विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण संस्थेत प्रवेश घेतला, त्याचवेळी ही संख्या २०२०-२१ मध्ये ४.१४ कोटींवर पोचली. त्यानुसार उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या तीन दशकांत दहा पटींनी वाढली आहे. उच्च शिक्षण संस्थांचा विचार केला तर २०२१ मध्ये देशात १११३ विद्यापीठे आणि समकक्ष संस्था होत्या. तसेच ४३,७९६ विद्यापीठे आणि ११,२९६ अन्य संस्था होत्या. यावर्षी देशातील उच्च शिक्षण संस्थांत १५.५१ लाख शिक्षक असल्याची नोंद आहे.

देशातील अनेक विद्यापीठे केंद्रीय विद्यापीठ आहेत आणि अनेक राज्यस्तरीय विद्यापीठे आहेत. यशिवाय मोठ्या संख्येत खासगी



विद्यापीठे आहेत आणि अभिमत विद्यापीठे म्हणजे डीम्ड युनिव्हर्सिटी आहेत. देशात जागतिक दर्जा प्राप्त अनेक व्यवस्थापन आणि अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत आणि तेथून शिक्षण घेणारे विद्यार्थी जागतिक कंपन्यांमध्ये उच्च पदासाठी पात्र ठरत आहेत. शिक्षणाच्या खर्चाच्या बाबतीत भारतीय शिक्षण संस्थांतले शुल्क हे परदेशी संस्थांपेक्षा तुलनेने कमीच आहे. तसेच ज्या परकी संस्थांत भारतीय विद्यार्थी प्रवेश घेत आहेत, त्यापैकी अनेक विद्यापीठे दर्जा नसलेली आहेत. असे असताना भरभक्कम पैसे मोजून भारतीय तरुण परदेशात शिक्षणासाठी का जात आहेत? असा प्रश्न उपस्थित होत आहे. याचे सोपे उत्तर म्हणजे परदेशात जाणारे बहुतांश विद्यार्थी हे कोणत्याही प्रकारची उच्च शिक्षणाची पदवी मिळवण्यासाठी नाही तर रोजगार मिळवण्याच्या उद्देशाने जात आहेत. मात्र तेथेही प्रचंड बेरोजगारी आहे. प्रत्यक्षात यापूर्वी परदेशात गेलेल्या विद्यार्थ्यांच्या यशाची महती ऐकून आजचे विद्यार्थी परदेशात जात आहेत. मात्र आजघडीला कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि युरोपीय देशांतील शिक्षण संस्था हे आपले अस्तित्व वाचविण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांना सहजपणे प्रवेश देत आहेत.

# दातांचे आणि सामान्य आरोग्य निरोगी राखण्यासाठी सॅटेलाईट क्लिनिक मदतीचे ठरतील

लातूर, दि. १८ – लातूर शहरातील नागरीकांना दंत रोग व फिजिओथेरपी उपचार सेवा परिसरात उपलब्ध करुन देण्यासाठी डी. एस. कराड दंत चिकित्सालय आणि फिजिओथेरपी क्लिनिक सुरु करण्यात आले आहे. लोकांचे दंत आरोग्य आणि सामान्य आरोग्य निरोगी राखण्यासाठी हे दोन्ही सॅटेलाईट क्लिनिक मदतीचे ठरतील, असा विश्वास कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केला.माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व नेत्र प्रतिष्ठान संचलित डी. एस. कराड दंत चिकित्सालय, फिजिओथेरपी क्लिनिक यांचा शुभारंभ आणि 'अल्कॉन सेंचुरियन व्हिजन सिस्टिम' या अत्याधुनिक मोतीबिंदू फेको शस्त्रक्रिया मशिनचे अनावरण डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.गेल्या दिड दशकापासून एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या माध्यमातून दंत आरोग्य



व फिजिओथेरपी उपचार सेवा देवून हजारो रुग्णांना व्याधीमुक्त करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे लातूर शहरातील खाडगाव रोड व लातूर तालुक्यातील रुई रामेश्वर येथे यापुर्वी सुरु करण्यात आलेले सॅटेलाईट क्लिनिक लोकांसाठी सोयीचे ठरत आहेत, असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील बार्शी रोड व एमआयडीसी परिसरातील नागरीकांच्या सोयीसाठी दंत चिकित्सालय, फिजिओथेरपी क्लिनिक सुरु करण्यात आले आहे.हे सॅटेलाईट क्लिनिक सर्व अत्याधुनिक सोयींनी सज्ज असून येथील रुग्णांवर तज्ञ डॉक्टरांकडून योग्य व खात्रीशीर उपचार करण्यात येतील आणि जास्तीत जास्त रुग्णांना याचा फायदा होईल. सर्व सामान्य आरोग्याइतकेच दंत आरोग्य महत्वाचे आहे. लोकांचे दंत आरोग्य चांगले ठेवण्यासाठी व सामान्य आरोग्य सुदृढ राखण्यासाठी हे सॅटेलाईट क्लिनिक प्रयत्नशील राहील.लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेवटच्या रूग्णांपर्यंत दंत आरोग्य आणि फिजिओथेरपी उपचार सेवा पोहचणे गरजेचे आहे. त्यासाठी जिह्यात ठिकठिकाणी सॅटेलाईट क्लिनिकच्या उभारणीसाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याची खात्री डॉ. कराड यांनी दिली.समाजातील सर्व रुग्णांपर्यंत दंत आरोग्य सेवा या सॅटेलाईट क्लिनिकच्या माध्यमातून पुरवली जाईल, असे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी सांगीतले तर व्याधीमुक्त समाज निर्मीतीसाठी फिजिओथेरपी क्लिनिक कार्यरत राहील, असे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी सांगीतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जास्मीन फरास व प्रिती चेंकाळे यांनी केले तर शेवटी आभार दंत रोग तज्ञ डॉ. सोमनाथ गित्ते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व डी. एस. कराड आय इन्स्टिट्युट येथील विभाग प्रमुख, डॉक्टर, कर्मचारी, विद्यार्थी, रुग्ण व नागरीक उपस्थित होते.

# औसा तालुक्यातील अवैध दारू विक्री करणारी सराईत गुन्हेगारांची आणखीन एक टोळी लातूरसह तीन जिल्ह्यातून हद्दपार. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी काढले हद्दपारीचे आदेश

लातूर :- औसा तालुक्यातील अवैध दारू विक्री करणारी सराईत गुन्हेगारांची आणखीन एक टोळी लातूरसह तीन जिल्ह्यातून हद्दपार. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी काढले हद्दपारीचे आदेश* लातूर जिल्ह्यातील भाईगिरी व गुंडगिरी मोडीत काढण्यासाठी स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी जनसामान्यांना त्रास देऊन वेठीस धरणाऱ्या, नागरिकांच्या जीविताला व त्यांच्या मालमत्तेस धोका निर्माण करणाऱ्या असामाजिक तत्त्वांचा बीमोड करण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आज पावतो हद्दपारच्या एकूण चार प्रकरणात १२ सराईत व कुख्यात आरोपी विरुद्ध कार्यवाही करत त्यांना लातूर जिल्ह्यातून हद्दपार केले आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, औसा तालुक्यातील भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार अवैध दारू विक्रीचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी, सराईत गुन्हेगाराकडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये. याकरिता भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार अवैध दारू विक्रीचे गुन्हे करणाऱ्या दोन गुन्हेगारांना एक वर्षासाठी लातूर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

सदर गुन्हेगारांच्या टोळीचे अभिलेख पाहता पोलीस ठाणे भादा येथे ६ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून सदर टोळी विरुद्ध लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने प्रवृत्त करण्यासाठी फौजदारी पात्र अपराध करणे, दुखापत, हमला करण्याची पूर्वतयारी करून अवैध दारू विक्री करणे, दुखापत करणे, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने कारवाया करणे इत्यादी प्रकारचे एकूण ०६ गुन्हे पोलीस ठाणे भादा येथे दाखल असून त्यांचेवर अनेक वेळा प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली. परंतु त्यांच्या वर्तनात कोणत्याही प्रकारची सुधारणा न होता त्यांच्याकडून एखादा गंभीर दखलपात्र गुन्हा घडून जनतेच्या मालमत्तेस किंवा धोका इजा होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याने टोळी प्रमुख संदीप दिलीप गरड ,वय ३५ राहणार ,बिरवली तालुका औसा जिल्हा लातूर प्रवीण दिलीप गरड, वय २२ राहणार बिरवली, तालुका औसा जिल्हा लातूर. त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ प्रमाणे कार्यवाही करून दिनांक ११/१०/२०२३ रोजी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी हद्दपारिचे आदेश पारित करून नमूद तारखेपासून सदरच्या सराईत गुन्हेगारांना लातूर, सोलापूर व धाराशिव या तीन जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहेत.

हद्दपार केलेल्या नमूद गुन्हेगारांना भादा पोलिसांनी हद्दपार क्षेत्राचे बाहेर नेऊन सोडण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

सदरचा प्रस्ताव तयार करणे कामी उपविभागीय पोलीस अधिकारी,(औसा) रामदास इंगवले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस अंमलदार प्रदीप स्वामी, पोलीस ठाणे भादा चे सहाय्यक पोलीस निरीक्षक डोंगरे, व पोलीस अमलदार देशमुख , फड यांनी परिश्रम घेतले आहे.

सदर कारवाईच्या माध्यमातून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत गुन्हेगार,उपद्रवी लोकांवर जरब बसून सराईत गुन्हेगारांची टोळी जिल्ह्यातून हद्दपार केल्यामुळे इतर गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यां गुन्हेगारांना चांगलाच दणका बसला आहे.

# महात्मा बसवेश्वरमध्ये ज्ञानतीर्थ २०२३ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवातील गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचा सत्कार

लातूर दि. १८.१०.२०२३ श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानतीर्थ २०२३ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांचा त्यांच्या पालकासह महाविद्यालयाच्या डिजिटल सभागृहामध्ये नुकताच सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शिवशंकरप्पा बिडवे हे होते तर मंचावर शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक अँड. श्रीकांतप्पा उटगे, संचालक अशोकप्पा उपासे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भास्कर रेड्डी, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रारंभी संगीत विभागातील प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी शारदास्तवन व समूहगीत गायन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.ज्ञानतीर्थ २०२३ युवक महोत्सवात महाविद्यालयाने विविध कला प्रकारात एकूण ०८ बक्षिसे प्राप्त केली. यामध्ये एकांकिका उत्कृष्ट अभिनय: कु. वैशाली कांबळे सर्वप्रथम, शास्त्रीय तालवाद्य:



शिंदे गणेश द्वितीय पारितोषिक, समूह गायन: मिताली आगलावे, भक्ती पांचाळ, ज्ञानेश्वरी माळी, मुकडे शिवाली, नम्रता वाघमारे आणि साक्षी सूर्यवंशी सर्व द्वितीय क्रमांक, कव्वाली: कुंभार रोहित, धरणे कृष्णा, पांचाळ कैवल्य, पांचाळ विकास, शिंदे गणेश, अजय शेलार द्वितीय क्रमांक, लोकसंगीत: कुंभार रोहित, गरुड सोनाली, पांचाळ कैवल्य, पांचाळ भक्ती, पांचाळ विकास, माळी ज्ञानेश्वरी, नम्रता वाघमारे, शिंदे गणेश, अजय शेलार सर्व द्वितीय, एकांकिका: कांबळे वैष्णवी, मस्के वैभव, राऊत अनिकेत, वाघमारे आयुष द्वितीय, मुक अभिनय कांबळे वैष्णवी, गायकवाड ज्योती, चिकटे दीक्षा, भुरे सत्यम, रसाळ कार्तिक, वाघमारे आयुष तृतीय क्रमांक, लोकनृत्य सुनील कोल्हे, गरुड सोनाली, नरगुंडे वैष्णवी, निर्मल सानिया, रसाळ कार्तिक, राऊत अनिकेत, ज्ञानेश्वर वाघमारे, शिंदे समृद्धी, सुरवसे रोहित, धोटे तृतीय, या सर्व विजेत्या कलावंताचा त्यांच्या पालकासह महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

तसेच संघ प्रशिक्षक शिवशाहीर संतोष साळुंखे, धम्मपाल सकपाळ, गोपाळ जाधव, प्रा. गोविंद पवार आणि प्रा. कृष्णा हुमनाबादे यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी अध्यक्षिय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष मा. शिवशंकरप्पा बिडवे म्हणाले की, सांस्कृतिक विभाग हा महाविद्यालयातील एक अत्यंत महत्त्वाचा विभाग असतो. या विभागाद्वारे विद्यार्थ्यातील कलागुणांना सातत्याने वाव दिला जातो. संघ प्रशिक्षक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्याचा मानस संस्थेचा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले. प्रास्ताविकपर मनोगत उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मनोगतपर आभारातून सर्वांचे धन्यवाद मानले.

यावेळी पालक धनंजय मुकडे तसेच स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांनी आपली मनोगत व्यक्त केली.

संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. दिनेश मौने, डॉ. जितेंद्र देशमुख, प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. सुप्रिया बिराजदार, डॉ. गीता गिरवलकर, डॉ. उज्वला गायकवाड, प्रा. शैलेश कानडे, प्रा. शितल झुंजे, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. आशीष क्षिरसागर, प्रा. सुजाता पाटील, प्रा. भाग्यश्री वाघमारे, प्रा. विष्णू तातपुरे, प्रा. नागेश जाधव, डॉ. शिवप्रसाद धरणे, डॉ. कुंदन लोखंडे, प्रा. परमेश्वर पाटील, डॉ. अभय धाराशिवे, डॉ. राहुल डोंबे, प्रा. सोनू स्वामी, प्रा. शंकर भोसले, प्रा. अश्विनी इंद्राळे, डॉ. अभय धाराशिवे, भीमाशंकर सुगरे, योगेश मोदी, संतोष येचवाड, बालाजी डावकरे, आनंद खोपे, रंगनाथ लांडगे यांचाही गुणगौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला सांस्कृतिक विभागातील संयोजन समितीतील सर्व सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूरला स्वतंत्र विद्यापीठासाठी मुख्यमंत्र्यांना एक लाख पत्र पाठवून,आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीचा पोस्ट कार्ड मोहिमेचा समारोप

लातूर :- लातूर जिल्हयाची शिक्षण क्षेत्रातील भरारी पाहता, आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने लातूरला स्वतंत्र विद्यापीठाची मागणी शासन दरबारी वेळोवेळी लावून धरलेली आहे. माजी मुख्यमंत्री तथा लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या प्रयत्नातून २००७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत सुरु करण्यात आले आहे



त्याच धर्तीवर लातूर येथे शैक्षणिक गुणवत्तेवर विद्यापीठ मागणी गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने करण्यात आलेली आहे. लातूरकराच्या आग्रही मागणीतून व लातूरचे सुपुत्र माजी मुख्यमंत्री तथा लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या प्रयत्नातून २००७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत पेठ येथे उपकेंद्र सुरु करण्यात आले आहे . आज लातूर जिल्हयात कला, वाणिज्य, विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, विधि, अभियांत्रिकी, वैद्यकीय अनुदानित ३६ महाविद्यालय, तर कायम विनाअनुदानित ८२ असे जवळपास एकूण ११८ महाविद्यालये आहेत एकूण विद्यार्थी संख्या ५५,४१० आहेत तर लातूर शहरात त्यापैकी ४० महाविद्यालये आहेत. लातूरच्या शैक्षणिक, प्रशासकीय कामाचे स्वरूप लक्षात घेता, महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, पालकांना नांदेडला पायपीट करावी लागते आहे, शेजारच्या सोलापूर जिल्हयासाठी महाविद्यालयाची संख्या १०९ असताना विद्यार्थी, पालक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सोईसाठी २०१४ मध्ये स्वतंत्र विद्यापीठ शासनाने दिलेले आहे

मराठवाड्यात छत्रपती संभाजी नगर नंतर लातूर शहर, जिल्हयाचे शैक्षणिक योगदान मोठे आहे त्यामुळेच लातूर येथे शैक्षणिक गुणवत्तेवर विद्यापीठाची आग्रही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या वतीने करण्यात येते आहे. शिक्षणतज्ञ डॉ राम ताकवले व अन्य शिक्षण तज्ञांनी विद्यार्थी संख्या व महाविद्यालयाची आकडेवारी प्रमाणे जिल्हा निहाय विद्यापीठ स्थापन करणे काळाची गरज आहे, शैक्षनिक क्षेत्रात गुणवत्ता कार्य कुशलता वाढविण्यासाठी आवश्यक पूर्तता होणाऱ्या ठिकाणी नविन विद्यापीठ विस्तार होणे पुरक असल्याचे नमुद केले आहे कृती समितीच्या वतीने निवेदने, धरणे, स्वाक्षरी मोहीम , पोस्ट कार्ड मोहिमेतून आदीतून विद्यापीठाची मागणी सातत्याने लावून धरलेली आहे . माजी कुलगुरू, ज्येष्ठ विचारवंत डॉ जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते तर ज्येष्ठ विधिज्ञ व्यकटराव बेंद्रे, प्रा गोविदराव घार,प्रा जगनाथ पाटील, प्राचार्य प्रशांत घार यांच्या उपस्थितीत पोस्ट कार्ड मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला होता. लातूरला स्वतंत्र विद्यापीठासाठी राज्याचे मुख्यमंत्री मा ना एकनाथ शिंदे यांना एक लाख पत्र मुख्य पोस्ट कार्यालय लातूर येथून पाठवली असल्याची माहिती मुख्यसंयोजक अँड प्रदिपसिंह गंगणे यांनी दिली आहे आम्ही लातूरकर विद्यापीठ निर्माण कृती समितीच्या पोस्टकार्ड मोहिमेत ज्येष्ठ नागरिक, महीला, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील,शिक्षण प्रेमी, विद्यार्थी, पालक नागरिकांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला असल्याची माहिती विद्यापीठ निर्माण कृती समितीचे अँड प्रदिपसिंह गंगणे यांनी दिली आहे यावेळी बालाजी अप्पा पिंपळे, ताहेरभाई सौदागर, लाला सुरवसे, प्रा संगमेश्वर पांनगावे , जम्मालोद्दीन मणियार,जमील नाना, भिमराव दूनगावे, दिगबर कांबळे, महेन्द्र गायकवाड, अतिश नवगिरे, अँड बालाजी सिंगापूरे रेड्डी, अँड अभिजित मगर, अँड सुनिल फावडे , अँड राजेश खटके, अँड अमोल पोतदार, अँड बालाजी राजमल्ले, सुशील सुरवसे, राजु सुळ, भगवान जाभाडे, सुधिर देशपांडे, शेष नारायण वाघमारे, आदीची उपस्थिती होती

# शाळा दत्तक योजना आणि नोक-यांच्या कंत्राटीकरणा विरोधात फकिरा ब्रिग्रेडचे रास्तारोको आंदोलन

रेणापूर /प्रतिनिधी :- महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये लाखों नौक-यांचा अनुशेष शिल्लक असतांना ६ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाने जी.आर. काढून राज्यातील सर्व शासकीय विभागातील सरकारी नोक-यांचे कंत्राटीकरण केले, तसेच महाराष्ट्रातील ६२ हजार सरकारी शाळा, श्रीमंत, भांडवलदार, व्यापारी, उद्योगपतींना दत्तक देण्यासाठी १८ सप्टेंबर २०२३ रोजी शासनादेश काढून महाराष्ट्रातील गरीब, वंचित,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे आणि महसूल वाढवण्यासाठी दारूच्या दुकानांना मान्यता देण्याचे तसेच महाराष्ट्रातील विविध मंदिराना पर्यटन स्थळाचा दर्जा देऊन २४०० कोटी रूपये मंजूर करून एस.सी.एस.टी.ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी करण्याचे षडयंत्र हे तीनपाई सरकार करीत आहे. याचा निषेध करण्यासाठी फकिरा ब्रिगेडच्या वतीने रेणापूर येथे पिंळळफाटा अंबाजोगाई-लातूर रोड येथे दिनांक २०ऑक्टोबर २०२३ शुक्रवारी सकाळी ११.०० वाजता रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती फकिरा ब्रिग्रेडचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय विरूळे, तालुका अध्यक्ष गोविंद धबडगे,बाळू पटनुरे यांनी दिली आहे

सध्या केंद्र आणि राज्यात मनुवादी विचारांचे सरकार सत्तेवर कार्यरत असून यांना विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवायची नसून ग्रामपंचायत, महानगर पालिका, नगरपरिषदेच्या शाळांची मोक्याची जागा बळकावून तिथे मोठ्या -मोठ्या ईमारती, मॉल्स उभे करायचे आहेत ,त्यामुळे या शाळा व्यापा-यांना, भांडवलदार, श्रीमंतांना दत्तक देण्याचा घाट या मनुवादी सरकारने घातला आहे असा आरोप फकिरा ब्रिगेडच्या निवेदनात करण्यात आला आहे.सरकारने देशातील एस.सी.एस.टी.ओबीसी.समाजातील विद्यार्थ्यी, सुशिक्षित बेकार तरुणांचे आयुष्य उद्धवस्त करण्याचे धोरण अवलंबले आहे. केंद्र सरकारने कौशल्य विकासाच्या नावाखाली या देशातील बलुतेदारी पध्दत तसेच वर्णव्यवस्था,जातव्यवस्था कायम ठेवण्यासाठीच ही योजना सुरू केली आहे ,तर दुसरीकडे केंद्रात सचिव, उपसचिव, संचालक, उपसंचालक या सारख्या पदांवर सवर्ण समाजातील तरुणांची डायरेक्ट भरती केली जात आहे.या पदांना कंत्राटी पद्धत का लागू नाही असा प्रश्न समाजात उपस्थित केला जात आहे.या मनुवादी सरकारचा खरा चेहरा देशातील जनतेसमोर आला आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य असून या राज्यात म.फुले यांनी इंग्रजाकडे सक्तीच्या शिक्षणाचा अग्रह धरला, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले,नोक-यात आरक्षण दिले,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून १ते १४ वर्ष वयोगटातील मुलांमुलींना मोफत शिक्षणाची तरतूद केली;परंतु आज या सर्व विचार,धोरणाला मूठमाती देऊन राज्यकर्ते योजना राबवत असल्याचे सिद्ध झाले आहे.याचा निषेध





म्हणून रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनात फकिरा ब्रिगेडच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन फकिरा ब्रिगेडचे राज्य कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर,श्रीरंग सरवदे, प्रदेशाध्यक्ष, फकिरा ब्रिग्रेड,मा.श्रीमती उर्मिला नवगिरे, जिल्हाध्यक्ष, महिला आघाडी,लातूर,श्रीमती नागिनी थोरात, उस्मानाबाद सचिन शिंदे, संजय विरूळे, किशोर कसबे, सतीश शिंदे,,संतोष पटनुरे, पांडुरंग मस्के, गोविंद धबडगे,सुरेकांत कदम,बाळू पटनुरे, सुदर्शन शिंदे, मुकेश लोंढे, नाना लोंढे, ,अंगद कांबळे, लक्ष्मण खंडाळे, सुरेखा गायकवाड, सुभाष गायकवाड, विकास लोंढे, रमेश लोंढे, अंकुश कांबळे, दयानंद राऊत,राम उपाडे, विकास राऊत आदी कार्यकर्त्यांनी केले आहे

# फार्मासिस्ट बनलेल्या परीचराने दिल्या चुकीच्या गोळ्या, बालकाची प्रकृती गंभीर

जिंतूर : तालुक्यातील आडगाव बाजार येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रात बुधवार, दि.१८ ऑक्टोबर रोजी सकाळी सर्दी व तापाने आजारी असलेल्या १० व २ वर्ष वयाच्या बालकांस वैद्यकीय अधिकारी यांनी तापीच्या गोळ्या प्रिस्क्रिप्शन वरती लिहून दिल्या. परंतु फार्मसिस्ट बनलेल्या परिचराने तापी ऐवजी मधुमेहाच्या (शुगर) गोळ्या दिल्या. यामुळे एका बालकांची प्रकृती बिघडली होती. यावेळी त्वरित उपचार केल्याने दोन्ही बालकांची प्रकृती सुधारली तर एका बालकास जिंतूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.आडगाव बाजार येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथमेश विलास चव्हाण (वय १०) या बालकाला व्हायरल आजारामुळे आणले असता वैद्यकीय अधिकारी वैशाली जाधव यांनी बालकाला तापीच्या गोळ्या लिहून दिल्या. परंतु फार्मसिस्टचे पद रिक्त असल्याने तात्पुरते फार्मसिस्ट बनलेल्या परिचराने प्रथमेश याच्यासह दोन बालकांना तापी ऐवजी मधुमेहाच्या (शुगर) गोळ्या दिल्या. बालकाने शुगरची गोळी खाल्ल्याने त्याची प्रकृती बिघडली. तेंव्हा बालकाला त्वरित जिंतूरला दाखल करण्यात आले. सध्या बालकाची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आडगाव बाजार येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त जागा त्वरित भरुन बालकांच्या जीवाशी खेळणा-या दोषींवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी बालकांच्या पालकांनी व ग्रामस्थांन मधून होत आहे.कडक कार्यवाही झाली पाहिजे : चव्हाण मुलाला मागील दोन तीन दिवसा पासून ताप सर्दी होती म्हणून दवाखान्यात नेले होते.

# बांधकामावरील लोखंडी साहित्य चोरणारा जेरबंद.. लोखंडी साहित्य,वाहनासह १ लाख ६६ हजार रुपयाच्या मुद्देमाल हस्तगत. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- बांधकामावरील लोखंडी साहित्य चोरणारा जेरबंद. लोखंडी साहित्य,वाहनासह १ लाख ६६ हजार रुपयाच्या मुद्देमाल हस्तगत. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई. याबाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यामध्ये होणारे चोरी व घरफोडी चे गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देशित करून सूचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात विविध तपास पथके तयार करण्यात आली होती. सदरच्या पथकामार्फत जिल्ह्यात घडलेल्या,विविध पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपींची माहिती मिळवण्यात येत होती. गुन्ह्याची माहिती काढत असताना दिनांक १६/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, बांधकामावरील लोखंडी साहित्य चोरणारी टोळी कार्यरत असून सदरच्या टोळीने चोरलेला मुद्देमाल आज वाहनांमध्ये भरून इतरत्र विक्री करणार आहेत. अशी माहिती मिळाली. सदर माहितीची शहनिशा व विश्लेषण करून खात्री पटल्याने सदर पथकाने नांदेड रोडला जाणाऱ्या यशवंत शाळेसमोर थांबलेल्या ऑटोला ताब्यात घेऊन पाहणी केली असता सदर ऑटो मध्ये बांधकामाच्या काही सेंट्रींग प्लेट व सळई मिळून आल्या. ऑटो सोबत असलेल्या इसमाला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मनोज नागनाथ पांचाळ, वय २१ वर्ष, राहणार बोरी सलगरा, तालुका जिल्हा लातूर. सध्या राहणार कोयना पावर हाऊस जवळ,लातूर असे असल्याचे सांगितले तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या लोखंडी साहित्याबद्दल विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, गेले काही दिवसा पूर्वी मी आणि माझ्या सोबत मंगलाबाई किशोर सोनवणे, सविता कैलाश काळे, दोघे राहणार विलास नगर, नांदेड रोड, लातूर.

अश्यानी मिळून कव्वा रोड परिसरातील एका बांधकामावरील लोखंडी सळई व सेंट्रींग प्लेट चोरी करून काही साहित्य अगोदरच विक्री केले असून राहिलेला साहित्य आज विक्री करणार होतो असे सांगितले.

मिळून आलेल्या साहित्याबाबत लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनच्या अभिलेखाची पाहणी केली असता पोलीस ठाणे, विवेकानंद चौक गुन्हा रजिस्टर क्रमांक ६६२/२०२३ कलम ३७९ भादवी प्रमाणे बांधकामाचे लोखंडी साहित्य चोरीला गेले बाबतचा गुन्हा दाखल असल्याचे पोलीस पथकाच्या निदर्शनास आले.

त्यावरून वर नमूद मुद्देमाल व ऑटो तसेच रोख रक्कम असा ०१ लाख ६६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून पुढील कार्यवाही करिता मुद्देमाल व आरोपी संबंधित पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले आहे.फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

सदरच्या पथकाने गुन्ह्याची माहिती मिळताच वरिष्ठांचे मार्गदर्शनात नियोजनबद्ध व अतिशय वेगवान हालचाली करून मुद्देमाल आरोपीसह ताब्यात घेतला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकातील सहाय्यक फौजदार संजू भोसले, पोलीस अंमलदार सुधीर कोळसुरे, सिद्धेश्वर जाधव, योगेश गायकवाड, प्रकाश भोसले, यांनी केली आहे.

# महात्मा बसवेश्वरांविषयी अपशब्द वापरल्याबद्दल लिंगायत महासंघाकडून जितेंद्र आव्हाडांचा निषेध



लातूर : लिंगायत समाजाचे श्रध्दास्थान व बाराव्या शतकातील महान समाजसुधारक जगद्ज्योती महात्मा बसवेश्वरांबद्दल आ.जितेंद्र आव्हाड यांनी अपशब्द काढले आहेत. त्याचा लिंगायत महासंघाच्यावतीने जाहीर निषेध करण्यात येत असल्याचे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांनी सांगितले.बाराव्या शतकातील कर्मठ कालखंडात लोकशाहीची बीजे ज्यांनी रोवली. अनुभवमंटपासारखी संस्था स्थापन करून सर्वांना त्यात प्रवेश दिला. तळागाळातील माणसाच्या गळ्यातील ताईत बनलेल्या महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात समता, बंधूता, न्याय व कायक या तत्वाचा प्रत्यक्ष अमल केला. सर्वांना समान वागणुकीचा मार्ग दाखविला. क्षुद्र, अतिशुद्रांना देव आणि धर्माचा पर्याय दिला. मृतअवस्थेतल्या समाजव्यवस्थेला जीवंत करण्याचे काम केले. लाखो लोकांना लिहिते-बोलते केले. त्यांना जगण्याचे बळ दिले. अशा हिंमतवान महात्मा बसवेश्वरांबद्दल आ.जितेंद्र आव्हाडांनी महात्मा बसवेश्वरांनी आत्महत्या केली असे आवमानकारक उद्गार काढले व त्यांनी समस्त लिंगायत समाजाच्या व बसवप्रेमी समाजाच्या भावना दुखावण्याचे काम केले. त्यांना इतिहास माहित नसलेल्या विषयात बोलण्याची गरज काय होती? असा प्रश्न प्रा.सुदर्शनराव बिरादार यांनी जितेंद्र आव्हाड यांना विचारला आहे. महात्मा बसवेश्वरांचे ११६७ साली कुडलसंगम येथे महापरिनिर्वाण झाले. मात्र जितेंद्र आव्हाडांनी बसवेश्वरांबद्दल नको तो शोध लावून महात्मा बसवेश्वरांसकट समाजबांधवांचाही अपमान केला आहे. या अपमानाबद्दल समाज जितेंद्र आव्हाडांना माफ करणार नाही. त्यांच्या या वक्तव्याची त्यांच्या पक्षध्यक्षांनी गंभीर दखल घेवून त्यांच्यावर कार्यवाही करावी अशी मागणी लिंगायत महासंघाच्यावतीने करण्यात येत आहे तसेच लिंगायत महासंघाच्यावतीने महाराष्ट्रभर या वक्तव्याचा निषेध व्यक्त केला जात आहे.

# लातूर शहर भाजप महिला मोर्चा तर्फे जितेंद्र आव्हाड यांचा निषेध..

लातूर दि - लिंगायत समाजाचे संस्थापक जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्याविषयी आक्षेपार्ह व निंदनीय विधान करत एवढ्या मोठ्या महापुरुषांचा एकेरी उल्लेख केल्याबद्दल लातूर शहर महिला मोर्चा च्या वतीने माजी मंत्री आमदार जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यात आला.बुधवारी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. रागिणी यादव सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालय येथे जमा होत हा निषेध नोंदवला. तसेच यानंतर जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देत देखील जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यात आला.यावेळी भाजपच्या जेष्ठ नेत्या सौ.जयश्री संभाजी पाटील,महिला मोर्चा ओ.बी.सी सेलच्या शहर जिल्हाध्यक्ष हेमा येळे,महिला मोर्चाच्या सरचिटणीस प्रगती डोळसे, मंडळ अध्यख जयश्री भुतेकर,उपाध्यक्ष पूजा शेळके,शीतल पाटील आदीजण उपस्थित होते.



# आमदार विजयकुमार देशमुख यांच्या उपस्थीतीत स्वस्त डाळ विक्रीचा शुभारंभ

सोलापूर : भारत सरकारच्या ग्राहक व्यवहार विभाग आणि नाफेडने ६० रुपये किलो दराने नागरिकांसाठी दसरा व दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर भारत डाळच्या नावाने चना डाळ विक्री केली जाणार आहे. याची सुरुवात माजी. पालकमंत्री तथा आमदार विजयकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.महाराष्ट्र शासनाने दिवाळी राशन दुकानातून उपलब्ध करून दिला त्याच पद्धतीने भारत सरकारच्या ग्राहक विभागाकडून ६० रुपये उडीद डाळ उपलब्ध करून दिली जाणार आहे सर्वसामान्यांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी केल.. यावेळी शहरचिटणीस रोहीणीताई तडवळकर मा नगरसेवक रामचंद्र जन्नु युवा मोर्चा शहरअध्यक्ष डॉ किरण देशमुख मा सभागृहनेता संजय कोळी शिवानंद पाटील शहर उत्तर प्रभारी राजकुमार पाटील महिला शहर अध्यक्ष विजयाताई वड्डेपल्ली मा नगरसेवक अमर पुदाले अविनाश पाटील वदंनाताई गायकवाड शालन शिंदे बाजार समिती संचालक बसवराज इटकळे लक्ष्माण गायकवाड मंडल अध्यक्ष प्रथमेश आनंदकर देविदास बनसोडे.

# क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या चळवळीची समस्या पैसा ही नाही- जे.एस.पाटील.

मुंबई :- क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या चळवळीची समस्या पैसा ही नाही- जे.एस.पाटील.महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना संस्थापक,सल्लागार आणि स्वतंत्र मजदूर युनियन राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय जे.एस.पाटील यांच्या ६८ व्या वाढदिवसाच्या निमित्याने स्वतंत्र मजदूर युनियन आणि संलग्नता युनियन द्वारा आयोजित परिसंवाद विषय आंबेडकराईट ट्रेड युनियन कि अनिवार्यता (आंबेडकराईट कर्मचारियो का ब्राम्हणवादी कामगार संगठनो मे शामिल होना क्या उचित है ?) या परिसंवादाचे अध्यक्षीय भाषण करतांना क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या चळवळीची समस्या पैसा ही नाही- जे.एस.पाटील असे त्यांनी सांगितले.यावेळी मान.के.पी.नंदेश्वर युको बँक,मान.अनिल मून बँक ऑफ बडोदा,मान.रामू गजभिये एल.आय.सी.मान. प्रविण डोंगरे जनरल इन्शुरन्स,मान.अरविंद गेडाम बानाई नागपूर, मान.सिद्धार्थ राऊत बँक ऑफ महाराष्ट्र यांनी परिसंवाद मध्ये भाग घेतला होता.स्वतंत्र मजदूर युनियन राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय जे.एस.पाटील यांच्या ६८ व्या वाढदिवसाच्या निमित्याने महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटने १५,५०००० हजार रुपयाचा निधी आणि एम.एस.ई.बी बँकवर्ड क्लास सिनियर इंजिनिअर अंड ऑफिसर असोशियन यांनी ६,५०००० हजार रुपये निधी दिला.यातूनच हे सिद्ध होते की क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या चळवळीची समस्या पैसा ही नाही.कोणतेही आवाहान न करता २५ दिवसात २२ लाख रुपये इंजिनिअर लोकांनी आदरणीय जे.एस. पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्याने गोळा करून स्वतंत्र मजदूर युनियन वाढविण्यासाठी दिला.हा इतर क्षेत्रातील कामगार,कर्मचारी अधिकारी वर्गासाठी लक्षवेधी आणि प्रेरणादायी आहे. बुद्धिवान आहेत परंतु त्यांच्याजवळ निष्ठा नाही,असे लोक समाजाला विकण्याचे काम करतात.लोक धार्मिक,सामाजिक आणि राजकीय चळवळीला खूप महत्व देतात.वेळ पैसा,कष्ट,त्याग देतात. पण कामगार चळवळीला महत्व देत नाही. आदरणीय जे.एस.पाटील यांनी आपल्या ६८ व्या वाढदिवसाच्या परीसंवादत अशी खंत व्यक्त केली. सामाजिक आंदोलनासाठी निष्ठेची खूप गरज आहे. निष्ठेशिवाय कोणतेही आंदोलन चालविणे किंवा ते यशस्वी करणे शक्य नाही. जर तुम्ही आंदोलन उभे करायचे ठरविले असेल तर निष्ठेची खूप गरज आहे. निष्ठेचा काय अर्थ आहे जे स्वप्न घेऊन तुम्ही पुढे चालत आहात त्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी जे काम तुम्ही सुरु करता त्या कामाला आचार विचार करून स्वीकार केले पाहिजे. आणि जर विचार करून स्वीकार केले असेल तर जिंदगीभर ते पूर्ण करण्यासाठी ते निभवाल तर तुम्हाला निष्ठावान आहेत आणि आणि या कामाला पूर्ण करण्यासाठी तुम्ही जीवनभर कष्ट केले असे म्हणता येते असे आदरणीय जे.एस.पाटील यांनी सांगितले.




आंदोलन चालवण्यासाठी निष्ठेची आवश्यकता आहे. परंतु आंदोलन फक्त निष्ठेच्या विश्वासावर चालत नाही. बुद्धीची पण गरज असते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की मला निष्ठावान लोक पाहिजेत,बुद्धीची भरपाई मी करेन बुद्धीला बाबासाहेबांनी दुसऱ्या स्थानावर ठेवले. निष्ठा नाही आणि केवळ बुद्धी आहे तर खूप भयावह आहे.कारण जे बुद्धिवान आहेत त्यांच्याजवळ निष्ठा नाही, असे लोक समाजाला विकण्याचे काम करत आहेत.त्यामुळेच क्रांतिकारी आंबेडकरी विचारांची कामगार चळवळ वाढली नाही.ते वाढविण्याच्या कामात आपण कामगार कर्मचारी अधिकारी म्हणून झोकून द्या. त्यामुळेच क्रांतिकारी आंबेडकरी विचारांच्या चळवळीची समस्या पैसा ही नाही- जे.एस.पाटील यांनी देशातील २५ राज्यात आणि ३२ क्षेत्रात संघटीत असंघटीत कामगारांना स्वतंत्र मजदूर युनियन (आय.एल.यु.) राष्ट्रीय ट्रेड युनियनशी संलग्न करून दाखविले. या परिसंवादाचे सूत्रसंचालन दिनेश बोरकर यांनी केले तर आभार नरेंद्र जारोंडे यांनी मानले.

# आदिनाथच्या पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

करमाळा प्रतिनिधी सहकारी साखर कारखान्यासाठी उजनी धरणातून आठ इंची दोन पाईपलाईन टाकण्याचे कामाचं भूमिपूजन भैरवनाथ शुगरचे संचालक सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशासकीय मंडळ अध्यक्ष बाळासाहेब बेंद्रे संचालक महेश चिवटे ,संजय गुटाळ , नासिर कबीर विशाल परदेशी उपस्थित होते.आदिनाथ कारखान्याची पहिली जुनी सिमेंटची पाईपलाईन पूर्णपणे फुटलेली आहे.येणाऱ्या काळात आदिनाथ सहकारी कारखाना डिसलरी प्रकल्प इथेनॉल प्रकल्प सुरू करणार आहे यासाठी आवश्यक असणारा आठ इंची दोन पाईपलाईन २१ दिवसात पूर्ण करण्याचा निर्णय संचालक मंडळांनी घेतला असून ही योजना पूर्ण करण्यासाठी तब्बल ८० लाख रुपये खर्च येणार आहे. अत्यंत काटकसरीने स्वस्तात पाईप खरेदी करण्यात आले असून सहकारी साखर कारखाना तालुक्याची विकास गंगा असल्यामुळे शेतकऱ्यांच्या क्षेत्रातून पाईपलाईन जाण्यासाठी या भागातील शेतकऱ्यांनी संमती दिली आहे.ज्या ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून आदिनाथ कारखान्याची पाईपलाईन जाणार आहे त्या सर्व शेतकऱ्यांचा सत्कार संचालक मंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे.आदिनाथ कारखान्याची पाणीपुरवठा योजना २१ दिवसात पूर्ण करण्याचे शिवधनुष्य मी उचलले असून ते पूर्ण करणार असा विश्वास प्रशासकीय संचालक संजय गुटाळ यांनी व्यक्त केला आहे.



# प्राचार्य क.हे.पुरोहित हे तत्त्वनिष्ठ प्रशासक - प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड माजी प्राचार्य के.एच.पुरोहित यांना भावपूर्ण श्रद्धांजली दयानंद विज्ञान महाविद्यालयात शोकसभा

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य के.एच.पुरोहित यांचे दि.१४ ऑक्टोंबर २०२३ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्याबद्दल दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१८ ऑक्टोंबर २०२३ रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी माजी प्राचार्य कै.के.एच.पुरोहित यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व त्यांच्यासमवेत सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षक डॉ.



संध्या कोल्हे,प्रा.बळवंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड हे शोक व्यक्त करताना असे म्हणाले की,माजी प्राचार्य कै.के.एच.पुरोहित यांनी लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नची सुरुवात करण्यात व दयानंद शिक्षण संस्थेचे नावलौकिक करण्यात फार मोठे योगदान दिलेले आहे.ते दयानंद विज्ञान महाविद्यालयात १९६७ ते १९९० पर्यंत कार्यरत होते. ते कुशल प्रशासक,कर्तव्यनिष्ठ,तत्त्वनिष्ठ, विद्यार्थीप्रिय,शिस्तप्रिय प्राचार्य आणि हाडाचे शिक्षक होते.त्यांनी कला,विज्ञान आणि साहित्य क्षेत्रातही आपला ठसा उमटविलेला होता.अशा या दिग्गज,ज्ञानसंपन्न असलेल्या प्राचार्य कै.के.एच.पुरोहित यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो आणि दयानंद विज्ञान परिवार व दयानंद शिक्षण संस्था त्यांच्या कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहे,अशी भावना त्यांनी व्यक्त केली.याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# स्पेशल ऑलिम्पीक्स'च्या लातूर जिल्हा समितीवर अजय गोजमगुंडे

लातूर :दिव्यांग नागरिकांच्या उन्नती व बौद्धीक विकासासाठी कार्यरत असलेल्या स्पेशल ऑलिम्पीक्स भारत सेवाभावी संघटनेच्या लातूर जिल्हा समितीवर प्रसिद्ध उद्योजक श्री अजय गोजमगुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.स्पेशल ऑलिम्पीक्स भारत सेवाभावी संघटनेच्या अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया व विभाग संचालक डॉ. भगवान तलवारे यांनी ही नियुक्ती केली आहे. स्पेशल ऑलिम्पिक्स भारत ही लोकांची जागतिक चळवळ आहे. जिथे क्षमता किंवा दिव्यांगत्वची पर्वा न करता प्रत्येक व्यक्तीला स्वीकारले जाते. सर्व भेदभाव संपवण्यासाठी खेळ, आरोग्य, शिक्षण आणि नेतृत्व घड़वून ही चळवळ बौद्धिकदृष्ट्या अक्षम लोकांना सक्षम करून जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळावे, यासाठी संस्था प्रचार व प्रसारार्थ कार्यरत आहे.या निवडीबद्दल श्री अजय गोजमगुंडे यांचे उदय गोजमगुंडे, नीलेश ठक्कर, भारतमामा माळवदकर, धनंजय बेम्बड़े, चंद्रकांत झेरिकुंठे, विजयकुमार स्वामी, तुकाराम पाटील, राजेश मित्तल, अनिरूध्द कुर्डुकर, जयप्रकाश दगड़े, अशोक पांचाळ, सुनिल लोहिया, सुधाकर जोशी, धर्मवीर भारती, नागनाथ गित्ते, चंदूलाल बलदवा यांनी अभिनंदन केले.


PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE